लोकमत

## यंत्रणा लागली कामाला : विविध स्वरूपातील कामांतून जिल्हा परिषदेला लाभले 'वैभव'

# जिल्ह्याच्या मिनी मंत्रालयाने टाकली कात; कर्मचारी वेळेपूर्वी कार्यालयात!

सुनील काकडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जिल्हा परिषदेचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे हे स्वत: ठीक ९:४५ ला कार्यालयात पाय ठेवून कामकाज सुरू करीत आहेत. यासह चुकीच्या कामांवर बोट ठेवून कामकाज सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम झाला असून यंत्रणा कसून कामाला लागली आहे. सर्व विभागप्रमुखांसह अन्य अधिकारी, कर्मचारी वेळेपूर्वी कार्यालयात हजर व्हायला लागले आहेत. परिणामी, कामकाज गतिमान झाल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध स्वरूपातील योजनांची माहिती व त्याचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा परिषदेचा कारभार गतिमान करण्यासाठी सध्या सीईओंसह सर्व विभागप्रमुखांनी कंबर कसली आहे.

सीईओ वैभव वाघमारे यांनी कार्यतत्पर कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा आसूड उगविणे सुरू केले. यामुळे यंत्रणा कसून कामाला लागली असून कामकाज अधिक गतिमान झाल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे.



### ९:३० ला उघडतात दरवाजे; ९.४५ ला कामकाज सुरू

सीईओ वैभव वाघमारे यांनी वेळेला अत्याधिक महत्त्व देत कार्यालयीन वेळा चोखपणे पाळण्याचे सक्त निर्देश दिले. अधिकारी अन् कर्मचाऱ्यांकडूनही त्याचे पालन करणे सुरू झाले आहे. जिल्हा परिषदेचे दरवाजे सकाळी ९:३० ला उघडून ठीक ९:४५ ला कामकाज सुरू होत आहे. सीईओ वाघमारे हे स्वत: ९:४५ ला खुर्चीत विराजमान होतात, हे विशेष.

### जि.प. मधील कार्यालये सर्वांसाठी झाली खुली

या संकल्पनेचा अवलंब करत जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालयांचे दोन्ही दरवाजे सर्वांसाठी खुले करून देण्याची सूचना सीईओंकडून करण्यात आली. त्यामुळे गेल्या काही दिवसांत प्रत्येक दालनाचे दरवाजे खुले झाल्याचे दिसत आहे. यामुळे कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



### श्रमदानातून स्वच्छता अन् वृक्षलागवड

- जिल्हा परिषदेचा परिसर स्वच्छ करून वृक्षलागवड करायची; मात्र हे काम अधिकारी अन् कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून मार्गी लावायचे, अशी संकल्पना सीईओ वाघमारे यांनी मांडली.
- अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यास अपेक्षित प्रतिसाद दिला. परिसर झाडून स्वच्छ करण्यासह बहुपयोगी वृक्षांची लागवड करण्यात आली. यामुळे जि.प.चा परिसर मनोहारी झाला आहे.

### जि.प. शाळांचा दर्जा सुधारणार

जिल्हाभरात जि.प. शाळेच्या मुख्याध्यापकांची एकत्रित बैठक घेवून शैक्षणिक दर्जा सुधारण्यासंबंधी सीईओंनी मार्गदर्शक सूचना केल्या. यासह शाळा व अंगणवाडीच्या भिंती बोलक्या करण्याचा निर्धार करण्यात आला. त्याअनुषंगाने सबंधित यंत्रणा कामाला लागली आहे.

### प्रत्येक महिन्यात तक्रार निवारण दिन

जिल्हा परिषदेचा कारभार गतिमान करण्यासोबतच नागरिकांच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे.

> मी रुजू होण्यापूर्वीही वाशिम जिल्हा परिषदेचे कामकाज सुरळित सुरू होते. अधिकारी, कर्मचारी सहकार्याची भूमिका ठेवून आहेत. जिल्हा परिषदेचे कामकाज गतिमान होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील.
>
> **- वैभव वाघमारे**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., वाशिम

